।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव Formerly North Maharashtra University,Jalgaon)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ




## परिपत्रक क्र. 45/2026

**विषय** :- गुण पडताळणी (Only Verification)/ उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photo copy of Answerbook with Verification)/पुनर्मूल्यांकन (Redressal-Challenge to Valuation) बाबत.

---

**विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेच्या मागील बैठकीत परीक्षा गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने चर्चा करत असतांना गुणपडताळणी व पुनर्मूल्यांकनाबाबत मार्गदर्शक सूचना त्याचप्रमाणे सदर बाबतीत असलेले नियम व अध्यादेशाच्या अनुषंगाने परिपत्रक निर्गमीत करुन विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करावी, असे मुद्दे विचारात घेण्यात आले आहेत.

तदनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, गुण पडताळणी व पुनर्मुल्यांकनासंदर्भात खालील बाबी प्रकर्षाने प्राध्यापकांच्या / शिक्षकेतर कर्मचारी व विशेषकरुन विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात :-

1. विद्यार्थ्यांसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,2016 तसेच अध्यादेश क्र.149 अन्वये गुणपडताळणी (Verification)ची सुविधा उपलबध करुन दिलेली आहे. सदर अध्यादेश विद्यापीठाच्या Digital University Portal वरील http://nmuj.digitaluniversity.ac/studentlogin.aspx या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. गुणपडताळणीसाठी अर्ज करण्याची मुदत, शुल्क व इतर आवश्यक तपशील अध्यादेशामध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

   गुणपडताळणी प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या सर्व प्रश्नांना गुणदान करण्यात आलेले आहे किंवा नाही, तसेच गुणांची नोंद व बेरीज अचूक आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्यात येते. एखाद्या प्रश्नास गुणदान झाले नसल्याचे अथवा गुण नोंदवितांना त्रुटी झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर बाब मुळ मुल्यांकनासाठी संबंधित परीक्षकाकडे पाठविण्यात येते व आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. गुणपडताळणी प्रक्रियेमध्ये (Verification ) विद्यार्थ्यांचे गुण वाढले असल्यास विद्यार्थ्यास नियमानुसार वाढीव गुण कळविण्यात येतात.

2. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त करण्याची व पुर्नूल्याकंनासाठी (Challenge to Valuation) अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. या संदर्भातील नियम, अटी, कार्यपध्दती व कालमर्यादा, अध्यादेश 134 मध्ये नमूद करण्यात आलेल्या असून सदर अध्यादेश विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थावर या उपलब्ध आहे. तसेच गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत, व पुनर्मूल्यांकन या संदर्भातील विविध परिपत्रके, सूचना व पत्रव्यवहार विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Examinations Section अंतर्गत Circulars या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

..2

3. विद्यार्थ्याने फोटोकॉपी साठी अर्ज केल्यानंतर त्यांना Student Login ला त्या विषयाची उत्तरपत्रिकेची PDF प्राप्त होते. विद्यार्थ्यांनी प्राप्त झालेल्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आवश्यक वाटल्यास विहीत कालमर्यादेत पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करावा.
4. Redressal प्रक्रियेत विद्यार्थ्याने अर्ज केल्यानंतर त्या विषयाची उत्तरपत्रिका मुळ परीक्षका व्यतिरिक्त त्या विषयाच्या पॅनेलवरील इतर परीक्षकांकडून तपासून घेण्यात येते. उत्तरपत्रिकांची पुनर्तपासणी करतांना पहिल्या परीक्षकाने दिलेले गुण, पुनर्मूल्यांकन करणाऱ्या परीक्षकाला माहिती नसतात, या अंतर्गत जर गुणांमध्ये अधिक तफावत असेल तर तीच उत्तरपत्रिका तिसऱ्या परीक्षकाकडून तपासून घेतली जाते. तदनंतर विद्यार्थ्याला गुणांमध्ये बदल झाला किंवा नाही याबाबत ई-मेलव्दारे कळविण्यात येतो. सदरील प्रक्रियेची अद्ययावत स्थिती त्याच्या लॉगीनला दिसते.
5. गुणपडताळणी व पुनर्मूल्यांकनाचे अर्ज सादर करण्याची मुदत, शुल्क, आवश्यक सुचना व इतर तपशील परीक्षा विभागामार्फत वेळोवेळी जाहीर करण्यात येतात, विद्यार्थ्यांना परीक्षा निकालानंतर वेळेत या संदर्भात अर्ज सादर करणे आवश्यक असून, अर्ज प्रक्रिये संदर्भात सर्व अद्ययावत माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित सूचनांचे अवलोकन करावे.
6. गुण पडताळणी व पुनर्मुल्यांकना संदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास विद्यापीठ दूरध्वनी क्र. 0257-2257306-307, भ्रमणध्वनी क्र. 9423185077 वर संपर्क साधावा.

करीता, वरील ठराव विचारात घेता, सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ प्रशाळा/विभाग यांनी उपरोक्त बाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(प्रा.योगेश ना.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/प व मू.वि./2205/2026
दिनांक : 10/07/2026

प्रति,

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे **मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक**
2) **मा.संचालक/विभाग प्रमुख, शैक्षणिक प्रशाळा / विभाग,कबचौउमवि,जळगाव**.
(यांना असेही सुचित केले जाते की, ओपन हाऊसबाबत व समितीबाबत विद्यार्थ्यांना वेळोवेळी माहिती अवगत करावी)

**प्रत माहितीसाठी** :-

1) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव 2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) मा.कुलसचिव कार्यालय, क बचौउमवि, जळगाव